
पुष्प **स्वाध्यायमाला** २१२ वे



# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर

## फाल्गुन

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 1548
BVBK-0401548

भारतीय सण व उत्सव

या पुस्तिकांसाठी उपयोगात आणलेले **संदर्भ-ग्रंथ**

**मध्ययुगीन चरित्रकोश**—ले. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव; **नवनीत**—ले. नारायण बाळकृष्ण गोडबोले; **आर्यांचे सण**— ले.' ऋग्वेदी '; **जिवंत व्रतोत्सव**— ले. काका कालेलकर; **संस्कृति समवाय** — ले. वत्सला भाटे. **स्वामी विवेकानंद**— ले. त्र्यं. ग. बापट; **सहा थोर पुरुष**— ले. न. र. फाटक आणि अनेक लेखकांनी लिहिलेली चरित्रे.

**स्वा ध्या य मा ला**

**संपादक-मंडळ**

डॉ. ग. श्री. खैर, एम्. ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी. एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी. ए. (ऑ.), एम्. ईडी.

प्रकाशक : डॉ. गं. श्री. कोशे,
अ. वि. गृह प्रकाशनाकरिता,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

मुद्रक : दि. दा. गांगल,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

आवृत्ती पहिली : १९५७
आवृत्ती दुसरी : १९६५

© प्रकाशकाधीन

वाचनालय

स्वाध्यायमाला : पुष्प २१२ वे पा. वा. प्रथम विभाग

१५४८
१५/४८३

## भारतीय सण व उत्सव

# फाल्गुन मास

वा. क्र. १५४८ १५/४८३
विषय ........ क्र. ..........

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर,
मुंबई

★

BVBK-0401548

किंमत ७५ पैसे

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २

सर्वाधिकार स्वरक्षित

आवृत्ती पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळात वर्षात येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळा त्यांतील काही उत्सव घरी साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासही मुले जात. त्यामुळे भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणीच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचे सध्याचे घटते प्रमाण इ. मुळे तशी स्थिती राहिलेली नाही. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनाने ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीने आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधी प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नावाजलेल्या लेखिकेने आत्मीयतेने सोप्या भाषेत थोडक्यात पुष्कळ माहिती दिली आहे. बालकांना व प्रौढ साक्षरांना ही पुस्तके आवडतील असा आम्हांस भरवसा आहे.

### १. मालेतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाही आवश्यक असे ज्ञान या पुस्तकाच्या वाचनाने मिळते.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकात दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालये, संघ, दल या संस्थांची वाचनालये व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठी.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगी भेट देण्यासाठी; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगी पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचे स्वरूप :

* सुसंस्कृत नागरिकास असे वाटत असते की, आपल्या सभोवतालच्या वस्तू (विमान, रेडिओ, विजेची शक्ती इ.), राजकारणातील चालू प्रश्न; थोर पूर्वजांची चरित्रे, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास यांची माहिती आपणास असावी. मालेसाठी विषय निवडताना वरील दृष्टी ठेविली आहे.
* शाळेत स्थूलमानाने ज्या विषयांचे शिक्षण होते त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीही या पुस्तकांतून असते.
* मनोरंजक पद्धतीने उपयुक्त विषयांचे ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणे हा या मालेचा हेतू आहे.

# फाल्गुन

आता शेवटचा फाल्गुन महिना. थंडी कमी होत आलेली असते नि वसंत ऋतूची चिन्हे दिसू लागलेली असतात.

फाल्गुनातील महत्त्वाचा सण म्हणजे होळी ! फाल्गुनी पौर्णिमेला होळी असते. कोकणात व महाराष्ट्रात ह्याला शिमगा किंवा होळी म्हणतात. उत्तरेकडे दोलायात्रा म्हणतात नि दक्षिणेत कामदहन हे नाव आहे.

## हुताशनी पौर्णिमा

उत्तरेकडे हा कृष्णासंबंधीचा सण मानला जातो. कृष्ण लहान असताना त्याला मारण्याचे कंसमामाने पुष्कळ प्रयत्न केले. एकदा त्याने पूतना राक्षशिणीला धाडून दिली होती. तिचे विषमय दूध पिऊन कृष्ण मरण पावेल, अशी कल्पना होती कंसाची ! पण कृष्ण कृष्ण होता ! सर्वसाधारण नव्हता तो ! त्यामुळे पूतनेचे

दूध पिताना तिचे रक्त शोषू लागला तो ! विष तर त्याने पच-विलेच; पण वरती तिचे प्राणही घेतले !



पुराणात व भागवत ह्या ग्रंथांत ही कथा सांगितली आहे. होळीच्या दिवशी रात्रीच्या वेळी पूतनेला जाळण्यात आली असे उत्तरेकडील लोक मानतात.

महाराष्ट्रातील व कोकणपट्टीतील लोकांची कल्पना वेगळी आहे. फार पूर्वी ढुंढा नावाची राक्षशीण मुलाबाळांना पीडा देत असे. तेव्हा प्रचंड आगी पेटवून तिला भिवविण्याची व गावाबाहेर हुसकून लावण्याची युक्ती काढण्यात आली. अद्यापही गल्लो-गल्ली ह्या दिवशी होळ्या पेटविण्यात येतात.

दक्षिणेकडे होळीच्या उत्सवाला कामदहन असे जे म्हणतात त्याच्या मुळाशी पुढील कथा आहे.

**मदनदहन**

प्राचीन काळी तारकासुर राक्षस फार माजला होता. फक्त श्रीशंकराचा पुत्रच त्याला मारू शकेल, असा सर्व देवांचा समज

होता! पण शंकर पडला विरक्त! तो लग्न नि संसार कुठला करणार? देवांना वाटले, जर शंकराला पार्वतीशी लग्न करण्याची इच्छा झाली तर छानच होईल! त्यांनी मदनाला मध्यस्थी करण्याची गळ घातली. श्रीशंकर तप करण्यात गढले होते. मदनाने त्यांचे लक्ष पार्वतीकडे वेधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शंकर चिडले. त्यांनी आपल्या कपाळावरील तिसरा डोळा



उघडला आणि मदनाला जाळून टाकले. मदनाचेच 'काम' असे दुसरे नाव आहे. कामदहन म्हणजे मदनदहन.

पौर्णिमेच्या रात्री हा सण साजरा करितात. त्या वेळी घरातील मुख्य पुरुष हजर असतो. तो होळीची पूजा करतो. होळीच्या मधोमध आंबा, माड, पोफळ, एरंड किंवा केळ ह्यांपैकी एखादे झाड पुरण्याची चाल आहे.

आजकाल वाड्यांमधून सार्वजनिक होळी करण्यात येते. होळीच्या सणाला पुरणपोळी हे पक्वान्न करितात.

काही ठिकाणी पौर्णिमेच्या आधी पाच-सहा दिवसांपासून ह्या उत्सवाला सुरुवात होते आणि फाल्गुन कृष्ण पंचमीपर्यंत तो चालतो. ह्या पंचमीला **रंगपंचमी** म्हणतात.

ह्या उत्सवात एकमेकांवर गुलाल फेकण्याचा प्रघात आहे. उत्तरेकडे तर हा प्रघात विशेष आहे. गोकुळात कृष्ण गोपगोपीं-बरोबर 'होरी' खेळत असे. म्हणून अजून रंगीत पाण्याच्या पिचकाऱ्या हे लोक मारतात.

आपल्या इकडेसुद्धा रंगपंचमीचे महत्त्व असते. स्वराज्य-संस्थापक शिवाजीमहाराजांच्या आईवडिलांचे लग्न ह्या रंग-पंचमीच्या दिवशीच मजेने ठरले गेले. जिजाबाई ही लखूजी जाधवाची मुलगी. जाधव श्रीमंत सरदार होता. त्याच्या मानाने शहाजीचा बाप मालोजी भोसले गरीब होता. तरीही एकदा रंगपंचमीचा दरबार भरला असता लखूजी जाधवाने सहज गमतीने म्हटले, " जिजा नि शहाजी ह्यांचा जोडा छान दिसतो, नाही ?' त्यावेळी जिजा तर सारी चार वर्षांची होती.

हे शब्द ऐकून मालोजी खूष झाला. नि भर दरबारात लखूजीच्या मुलीचा आपल्या मुलाशी विवाह ठरला असे त्याने बोलून दाखविले. पुढे लखूजीच्या मनाविरुद्ध हा विवाह झाला ! पण म्हणूनच आपल्याला शिवाजीसारखे रत्न लाभले ! म्हणून रंगपंचमीचे आपण अवश्य स्मरण ठेवावयास हवे.

होळीत जाळण्यासाठी लाकडी वस्तू चोरून आणल्या जातात. नावाच्या लाकडी पाट्या तर फारच चोरीस जातात. ह्या शिवाय चुकून कोणाची खुर्ची किंवा बाक अंगणात पडला असला तर खुशाल उचलून होळीत फेकतात. अशा रीतीने चोरी करणे व दुसऱ्यांच्या वस्तूंचा नाश करणे अगदी गैर आहे !

त्याचप्रमाणे काहीतरी घाणेरड्या शिव्या देण्याची व शंखध्वनी करण्याचीही वाईट रीत आहे !

खरं म्हणजे, थंडीचे त्रासदायक दिवस संपल्याबद्दलचा हा सार्वजनिक होम आहे ! ह्या दिवशी वाईट सवयी, वाईट विचार ह्यांना आगीत टाकावयास हवे ! कारण आता चैत्री-पाडव्यापासून नवे वर्ष सुरू होणार ! स्वच्छ मनाने व स्वच्छ निरोगी शरीराने आपण नव्या वर्षाचे स्वागत करावयास हवे !

होळीच्या निमित्ताने दारू प्यायची, वाईटसाईट बोलावयाचे, हे प्रकार आता बंद झाले पाहिजेत ! तुम्ही वर्गणी काढून लाकडे आणा, होळी पेटवा नि आनंदाने नाचा, हसा, बोला. पण शिव्या का द्यावयाच्या ? आणि तोंडावर हात का मारावयाचा ? आपले पूर्वज करीत होते म्हणून आम्ही करतो, ह्या बोलण्यात अर्थ नाही ! आपले पूर्वज चांगले जे जे नि जेवढे करीत होते तेवढे करतो का आपण ? नाही ! मग वाईट का करावयाचे ?

श्रीकृष्णाच्या नावावर गुलाल उडविता. राधा-कृष्णाची सोंगे काढून रस्तोरस्ती हिंडता; पण त्यांत आचरटपणा का आणता ? लहान लहान मुलेही एकमेकांना आई-बहिणीवरून शिव्या देतात ह्या दिवशी. कृष्ण असे करीत होता का ? छे : ! —

दुर्योधनाने व दुःशासनाने द्रौपदीला सभेत ओढून आणली. आणि तिचा भलताच अपमान करण्यास ते धजले. त्या वेळी श्रीकृष्णाने तिची लाज राखली आणि पुढे सर्व कौरवकुळाचा त्याने नाश केला !

त्या श्रीकृष्णाच्या नावावर काहीतरीच माकडचेष्टा करायच्या ? चांगली मुले अशा गोष्टी स्वतः करीत नाहीत हे खरे आहे ! पण त्यांनी लहान वयातच पुढाकार घेऊन ह्या वाईट

गोष्टींना आळा घालावयाला हवा ! असे वाईट प्रकार करणाऱ्या लोकांत आपण मिसळून त्यांना सुधारावयास हवे ! म्हणजे वर्षअखेरीचा हा सण शुद्ध स्वरूपात साजरा होईल ! ह्या दिवशी हुतूतू, खो-खो इत्यादी खेळांचे सामने ठेवावे म्हणजे पौर्णिमेच्या चांदण्यात हे खेळ खेळून मन प्रसन्न होईल !

रंगपंचमीच्या दिवशी कोरडे रंग उडवावे हवे तर ! पण ओल्या रंगामुळे कपडे वाया जातात.

नाचगाण्याची आवड भागवावयाची आहे ना ? मग गोपींची व राधेची सोंगेच का घ्यावी ? मुलांनी व तरुणांनी लेजीम खेळावे, टिपऱ्या खेळाव्या आणि चांगलीशी गाणी गावी. अचकटविचकट बोलून नि गाऊन जर आनंद मिळत असेल तर लेजीम, टिपऱ्या, खो-खो, वा हुतूतू खेळून खात्रीने भरपूर आनंद मिळेल !

तेव्हा होळीमध्ये ह्या जुन्या, घाणेरड्या चाली जाळून टाकू या. अन् जणू हेच सांगण्यासाठी होळीच्या तिसऱ्या दिवशी, फाल्गुन वद्य द्वितीयेला संत तुकारामाची पुण्यतिथी येते.

## तुकारामबीज

तुकारामाला संतशिरोमणी—सर्व संतांचा मुख्य—म्हणण्यात येते. आपल्या महाराष्ट्रात अनेक राजे होऊन गेले. पण ते हयात असेपर्यंतच त्यांची आठवण राहिली. तेव्हा ज्ञानेश्वर, तुकाराम नि समर्थ रामदास हे तिघेच महाराष्ट्राचे खरेखुरे राजे म्हणावयास हवेत ! कारण महाराष्ट्राच्या हृदयावर ह्यांनी स्थापन केलेले राज्य अजून चालले आहे.

तुकाराम जातीने कुणबी होता. तो वाण्याचा धंदा करीत होता. त्याचे आडनाव मोरे होते. त्याच्या वडिलांचे नाव बोल्होबा.

तुकारामाची जात वैश्य होती असे कोणी कोणी म्हणतात; पण तो स्वतःला शूद्र म्हणवून घेत असे. एवढेच नव्हे तर आपण शूद्रवंशात जन्मलो, ही ईश्वराची कृपा ! नाहीतर मी मदाने-गर्वाने-फुगून व्यर्थ गेलो असतो असे तो म्हणत असे.



संत तुकाराम

तुकारामाचा पहिल्यापासूनच देवभक्तीकडे ओढा ! त्यातच गावात मोठा दुष्काळ पडला ! त्यात तुकारामाची बायको आणि गुरेढोरे अन्नावाचून मेली ! नंतर त्याचा मुलगाही वारला. त्यामुळे तुकारामाचे वैराग्य वाढले. तशातच त्याची दुसरी बायको जिजाबाई फार तापट नि तोंडाळ होती ! त्याचा परिणाम असा झाला की, तुकारामाचे संसारातील लक्ष पार उडाले.

एकदा एका शेतकऱ्याने तुकारामाला राखणीचे काम दिले. तुकाराम हातात गोफण घेऊन शेत राखावयास बसला.

पाखरे आली नि दाणे खाऊ लागली; पण तुकारामाने गोफणीतून एकही दगड मारला नाही. पाखरे आपली पोटभर

दाणे खात होती. गावात काही दुष्ट लोक होते. त्यांनी ही संधी साधली. आपली गुरे चरण्यासाठी दिली त्या शेतात सोडून !—

तुकोबा आपले देवाचे भजन करण्यात गुंतले होते अन् इकडे पाखरांनी आणि गुरांनी शेताचा फडशा पाडला !

ही बातमी कळताच शेतकरी धावत तिथे आला. शेताची ती नासाडी पाहून तो साहजिकच चिडला. "तुक्या, तुला काम नव्हते म्हणून काम दिले मी. आणि तू नुकसानी केलीस ना चक्क माझी ? तुझे घर विकून पैसे घेईन मी भरून !"

दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्याने धान्याच्या झोडणीला नि मळणीला सुरुवात केली. धान्याचा ढीग घातला आणि मोजणी सुरू झाली. दर वर्षीच्या दुप्पट धान्य भरले !—

शेतकरी वरमला. त्याने निम्मे धान्य आपल्याला ठेवले व निम्मे तुकारामाला देण्यासाठी गाडीवर घालून तो निघाला. तुकारामाला हे ऐकून बरे वाटले ! म्हणजे आपल्या पायी त्या शेतकऱ्याचे नुकसान तर झाले नाही ! त्याने आपल्याला दिलेले धान्य गोरगरिबांना वाटून टाकले !

फार काय, शिवाजीराजाने दागदागिने व भरजरी कपडे भेट म्हणून पाठविले. पण तेसुद्धा तुकारामाने परत केले ! त्याला एकाच गोष्टीची आवड होती. ती गोष्ट म्हणजे पांडुरंगाची भक्ती !

त्या काळी रामेश्वरभट्ट नावाचे एक शास्त्री होते. त्यांनी लोकांच्या सांगण्यावरून तुकारामाला बोलावून घेतले, त्याला

अभंग रचण्याची मनाई केली आणि रचलेले सर्व अभंग इंद्रायणी नदीत बुडविण्याची आज्ञा केली ! तुकारामाने रामेश्वर ब्राह्मणाला



ईश्वर मानले आणि आपल्या हाताने अभंगाच्या पोथ्या पाण्यात बुडविल्या अन् इंद्रायणीच्या तीरीच उपोषण आरंभिले. चौदाव्या दिवशी पांडुरंगाने स्वतः त्या अभंगाच्या वह्या तुकारामाला परत दिल्या.

असा हा श्रेष्ठ संत सदेह वैकुंठाला गेला ! सर्वांचा शेवटचा निरोप घेण्यासाठी त्याने त्या वेळी फार सुन्दर अभंग म्हटला ! प्रेतयात्रेच्या वेळी अजून हाच अभंग म्हणतात. ऐका हं, तो.

आम्ही जातो आमुच्या गावा । आमुचा रामराम घ्यावा ।।
तुमची आमची हेची भेटी । येथुनिया जन्मतूटी ।।
आता असो द्यावी दया । तुमच्या लागतसे पाया ।।
येता निजधामी कोणी । विठ्ठल, विठ्ठल बोला वाणी ।।
रामकृष्ण मुखी बोला । तुका जातो वैकुंठाला ।।

आणि वारकरी लोक मोठ्या प्रेमाने 'ज्ञानबा, तुकाराम'चा जयघोष करतात.

तुकारामाची पुण्यतिथी साजरी करण्यासाठी त्या दिवशी त्याचे अभंग म्हणावे. त्यांचा अर्थ समजून घ्यावा. मनावर ठसवावा. भुकेल्या पाखरांना दाणे खाऊ घालावे. ज्या दिवसात पक्ष्यांना कोठे दाणे मिळत नाहीत, गवताचे बीसुद्धा कुजून गेलेले असते त्या दिवसात पाखरांना अवश्य दाणे टाकावे. तुकारामाचे ब्रीद चालविल्यासारखे होईल !

इंद्रायणीच्या काठी असलेल्या देहू गावी तुकाराम जन्मला, वाढला आणि वैकुंठाला गेला. तुकारामामुळे देहूला प्रसिद्धी मिळाली आहे. ज्ञानेश्वरामुळे आळंदीला अशीच प्रसिद्धी मिळाली आहे. भाविक लोक मोठ्या प्रेमाने म्हणतात की,

आळंदीत ज्ञानदेव । देहूत तुका ।।
प्रेमादरे तेथ जाईन । वाहीन माळबुक्का ।।

तुकारामाने आपल्याला काही नवीन शिकविले नाही. इतर संत जे सांगत आले तेच त्यानेही सांगितले; पण त्याने 'आधी केले मग सांगितले ! ' आपण स्वत: आधी ज्या गोष्टी आचरणात आणल्या त्याच त्याने लोकांना मग शिकविल्या. त्यामुळे त्याच्या वाणीत जिवंतपणा आला. त्याचे विचार, उच्चार नि आचार ह्यांमध्ये पूर्ण एकी होती. म्हणून त्याने शिकविलेल्या उपदेशाला वेगळाच जोर आला.

अशा थोर संताची पुण्यतिथी होळीच्या तिसऱ्या दिवशी येते. खुळचा कल्पनांच्या नादी लागून होळीच्या दिवशी अश्लील बडबडून त्याच तोंडाने, 'ज्ञानबा, तुकाराम' चा घोष करणे शोभेल काय ! तुळशीवृंदावनात दारूची चूळ टाकील का कोणी !.

तेव्हा आपल्या समाजातील ही घाणेरडी चाल नाहीशी करण्याच्या प्रयत्नाला लागा बर ! चांगली गोष्ट मोठ्या माणसांनी लहानांपासूनसुद्धा शिकावी. तुम्ही चळवळीला सुरुवात करा. म्हणजे मोठी माणसे तुम्हांला खात्रीने हातभार लावतील !

## शिवजयन्ती

ह्याच्या दुसऱ्याच दिवशी, फाल्गुन वद्य तृतीयेला शिवाजी महाराजांची जयन्ती येते. तिला शिवजयन्ती म्हणतात.



शिवाजीमहाराजांनी स्वराज्य स्थापले आणि आपल्या हिंदू धर्माचेही रक्षण केले. शिवाय त्यांना 'गो-ब्राह्मण-प्रतिपालक'ही म्हणतात. शिवाजीराजांनी मुसलमानांबरोबर लढाया केल्या. अनेकदा त्यांचा पराभव केला; पण मुसलमानी धर्माविषयी त्यांनी कधीही तिरस्कार दाखविला नाही! नाही तरी हिंदू लोकांनी मुसलमानांच्या मशिदी फोडल्याचे एकही उदाहरण आढळत नाही!

तुकाराम व रामदास हे दोघे संत शिवाजीच्या काळीच होऊन गेले. शिवाजीचे समकालीन संत होते ते! त्या काळी समाजावर संतांच्या शिकवणुकीची छाप पडली होती. त्यातच शिवाजीने देशाचे पूर्वीपासून संरक्षण करणारे किल्ले मोंगलांच्या हातून जिंकून घेतले आणि स्वराज्य स्थापले. मुसलमान झालेल्या

हिंदू सरदारांना त्याने परत हिंदू धर्मात घेतले. ह्यावरून शिवाजी-महाराजांचे मन मोठे होते, हेही दिसून येते. आणि ते केवढे थोर मुत्सद्दी होते हेही कळून येते. आपल्या धर्मातील लोक दुसऱ्या धर्मात—परधर्मात—गेले म्हणजे साहजिकच आपले बळ कमी होते. आणि परक्यांचे बळ वाढते ! ह्या गोष्टीला आळा घालणे आवश्यक असते ! ही महत्त्वाची कामगिरी महाराजांनी केली.

त्याचप्रमाणे त्यांची दरबारी वागणूक नावाजण्यासारखी होती. प्रत्येक काम वेळेवर झालेच पाहिजे. ठरविलेली योजना योग्य क्रमानेच पार पडावयास हवी. खर्च जमेपेक्षा अधिक होऊ नये. ह्या सर्व बाबतीत शिवाजीमहाराजांची शिस्त व चिकाटी उत्तम होती !

राज्य चालविण्यासाठी भरपूर द्रव्यबळ व मनुष्यबळ हवे, हे त्यांना नीट ठाऊक होते. म्हणून त्यांनी ह्या दोन्हीचा साठा केला.

श्रीरामचंद्राच्या काळीसुद्धा दरबारात अष्टप्रधान नेमण्याची पद्धत होती. शिवाजीमहाराजांनी ती पद्धत अमलात आणली आणि अष्टप्रधान नेमले. ह्या अष्टप्रधानांचा हुद्दा पुढीलप्रमाणे होता:—(१) प्रधान, (२) अमात्य, (३) सचिव, (४) मंत्री, (५) सेनापती, (६) सुमंत, (७) न्यायाधीश व (८) पंडित.

इतिहासकारांनी शिवाजीमहाराजांच्या कर्तबगारीचा गौरव केलाच आहे. मोरोपंतांसारख्या प्रसिद्ध कवीने तर त्यांना जनक राजाची उपमा दिली आहे.

दुसरे असे की, तुकाराम व रामदास ह्या संतांनी त्यांच्या-विषयी फार आदराचे उद्गार काढले आहेत. हे दोघेही संत निःसंग साधू होते. त्यांनी संसाराचा संबंध तोडला होता. रामदासांनी

तर संसार थाटलाच नाही; पण तुकारामाची स्थिती कमळाच्या पानासारखी होती. कमळाचे पान पाण्यात असते. तरीही त्याच्यावर पाण्याचे थेंब राहू शकत नाहीत. त्याच्यावर पडलेले पाणी लगेच ओघळून जाते. त्याचप्रमाणे जगाच्या दृष्टीने तुकाराम संसारी होता; परंतु संसाराच्या पाशात तो अडकला नव्हता ! हे अधिक कठिण आहे ! तेव्हा त्याला निःसंग म्हणावयाला काहीच हरकत नाही.

शिवाय हे दोघेही साधू होते. सहाही विकार त्यांनी धुऊन टाकले होते. तेव्हा शिवाजीमहाराजांकडून द्रव्यलाभ होईल ह्या लोभाचा मोह त्यांना पडला असेल म्हणून त्यांनी महाराजांची स्तुती केली असेल हे शक्यच नाही ! महाराज स्तुती करण्याच्या योग्यतेचेच असल्याने ह्या संतांनी त्यांची स्तुती केली हेच खरे !

तेव्हा अशा थोर पुरुषाची जयंती आपण साजरी करावयास हवी ! त्यांच्या असामान्य कर्तबगारीचे आपण स्मरण केले पाहिजे. म्हणजे स्वतःही थोडेफार कर्तबगार व्हावे, अशी उमेद आपल्याला वाटेल आणि आपापल्या क्षेत्रात अधिक यश मिळविण्याची स्फूर्ती आपणाला होईल.

**एकनाथ पुण्यतिथी**

ह्यानंतर फाल्गुन वद्य षष्ठीला संत एकनाथांची पुण्यतिथी येते. एकनाथ हे शांतता, दया, सहनशीलपणा, समता वगैरे गुणांचे मूर्तिमंत अवतार होते. बारा वर्षांचे असताना ह्यांनी जनार्दनस्वामींना गुरू केले. नंतर त्यांच्या हाताखाली विद्याभ्यास केल्यावर त्यांनी गुरूच्या आज्ञेने लग्न केले.

संसार व देवभक्ती ही दोन्ही कामे त्यांनी व्यवस्थित संभाळली. एकनाथांनी ह्या बाबतीत जगाला सुंदर धडा घालून दिला

आहे. संसारी माणसाला देवभक्ती करावयाला सवड मिळत नाही किंवा देवाची भक्ती जर करावयाची तर संसाराचा पाश घेऊच नये, अशा दोन टोकांना जातात काही संत! पण एकनाथांनीं ह्या दोन्हीचा सुवर्णमध्य साधला.

महात्मा गांधींनी ह्या सुधारलेल्या विसाव्या शतकात अस्पृश्यांना जवळ करण्याची चळवळ काढली. पण एकनाथांनी ही चळवळ सुरू केली होती. ते स्वतः महाराच्या घरी जेवले होते. आपल्या पितरांच्या श्राद्धाच्या वेळी त्यांनी महारांना जेवू घातले होते. फार काय, रस्त्यात एकदा त्यांनी एक गाढव तळमळताना



पाहिले. गंगेचे पाणी त्यांच्या हातात होते. ते पवित्र पाणी ह्या जनावराला कसे पाजावे, हा विचार त्यांना शिवला नाही. त्यांनी पटकन गाढवाला गंगा पाजली!

त्यांना राग कसा तो ठाऊकच नव्हता. एकदा एक यवन त्यांच्या अंगावर थुंकला. पण नाथ आपले शांतच ! एकंदरीत त्यांच्या अंगी सर्व साधारण माणसांपेक्षा पुष्कळच अधिक गुण होते.

त्यांनी भागवत हा लोकप्रिय ग्रंथ लिहिला आहे. त्याला एकनाथी भागवत म्हणतात. चातुर्मासात स्त्रिया काहीना काही नेम करितात. एकनाथी भागवताची पारायणे करणे हा त्यांतला एक नेम आहे.

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी व तुकारामाची अभंगाची गाथा ह्या दोन्हीप्रमाणेच एकनाथी भागवताला मोठा मान आहे.

एकनाथाने आपल्या ओव्यांच्या व अभंगांच्या शेवटी स्वतःचा ‘एकाजनार्दन’ असा उल्लेख केलेला आहे. ह्याला संस्कृत भाषा उत्तम येत होती. तरीही मराठी भाषेबद्दल त्याला फार आपुलकी असल्यामळे त्याने मराठीत ग्रंथ लिहिले. एवढेच नव्हे, तर ज्ञानेश्वरी ह्या ग्रंथात काही अशुद्ध शब्द घुसडले गेले होते. ते सर्व एकनाथांनी काढून टाकले. आणि सध्यांची ज्ञानेश्वरी जगाला दिली. दुसऱ्याचा ग्रंथ सुधारण्यासाठी एवढे श्रम घेणे हे साधारण माणसाचे काम नव्हे ! एकनाथ असाधारण होते—साधारण—सामान्य माणूस नव्हते ! त्यांच्या अंगी देवपण होते म्हणूनच त्यांना स्वतःला मोठेपणा मिळविण्याची आवड वाटली नाही !

एकनाथ अलौकिक पुरुष होते. अनाथ, दुबळ्यांना ते नेहमी मदत करीत. भक्तीचा आनंद स्वतः भोगीत. इतरांना तो भोगण्याचा मार्ग दाखवीत. ते स्वतः ग्रंथ रचीत आणि दुसऱ्यांना रचण्याची स्फूर्ती देत ! स्वार्थ त्यांना ठाऊकच नव्हता !

सुप्रसिद्ध कवी मुक्तेश्वर हा एकनाथांचा नातू. नाथांच्या मुलीचा मुलगा! हा मुक्तेश्वर जन्मतः मुका होता; पण नाथांच्या कृपेने त्याला वाचा फुटली आणि त्याने उत्तम काव्य केले.

अशा ह्या थोर संताने पैठण गावी कीर्तन करता करताच देह ठेविला!

ह्या नाथषष्ठीच्या निमित्ताने एकनाथी भागवत व इतर ग्रंथ अवश्य वाचावे. त्यांच्या स्वभावातील सगळे गुण त्यांच्या ग्रंथांत उतरले आहेत; त्यामुळे ते वाचून आपले मन उदात्त बनते!

पाणी स्वतः पवित्र असते नि इतरांना पवित्र करते. त्याप्रमाणे एकनाथांचे ग्रंथ स्वतः पवित्र आहेत नि वाचणाऱ्याच्या मनाला ते पवित्र बनवितात. कारण त्यांत खोटेपणा किंवा अहंपणा अगर बडेजाव वगैरे काहीही नाही! तेव्हा नाथषष्ठी साजरी करण्यासाठी एकनाथांचे चरित्र आणि त्यांचे ग्रंथ अवश्य अभ्यासावे.

**संभाजी महाराज–पुण्यतिथी**

आता फाल्गुन महिना संपत आला आहे. त्याच्या शेवटल्या दिवशी अमावास्येला छत्रपती संभाजी महाराजांचा मृत्यु-दिन येतो!

अमावास्या ही तिथी अशुभ मानली जाते! त्या दिवशी चंद्राचे मुळीच दर्शन होत नाही! चहूकडे काळोख दाटतो! आणि अशा काळोख्या दिवशी शिवाजीमहाराजांचा हा वडील मुलगा मरण पावला आणि मराठेशाही काळोखात बुडाली!!

संभाजी दोन वर्षांचा असताना त्याची आई सईबाई वारली. तेव्हा जिजाबाईने याला वाढविले. तो शूर होता; पण दुबळ्या मनाचा व हलक्या कानाचा होता. त्यामुळेच कबजी कलुषा नावाच्या खराब माणसाच्या नादी तो लागला! त्याचे कर्तृत्व वाया गेले!

तो पुढे मोगल सरदाराला जाऊन मिळाला! काही दिवसांनी तो परत शिवाजीमहाराजांकडे आला. पण एकंदरीत फार चंचल बुद्धीचाच होता तो! छत्रपतीच्या पदाला आवश्यक असणारा स्थिर धीमेपणा त्याच्या अंगी नव्हता!

शिवाजीमहाराज परलोकवासी झाल्यावर संभाजीला कळू न देता त्याच्या सावत्र आईने—सोयराबाईने—आपल्या मुलाला गादीवर बसविले. ह्याचेच नाव सावत्रपणा! पुढे संभाजीने सूड उगवला. सोयराबाईला त्याने ठार मारले! इतर अनेक जुन्या लोकांनाही त्याने परलोकाला धाडले! त्याला जुन्या लोकांचा संशय वाटू लागला. म्हणूनच कबजीसारखा परका माणूस त्याने जवळ केला.

औरंगजेबासारख्या प्रबळ बादशहालासुद्धा संभाजीचे भय वाटे! एकदा तर औरंगजेबाने त्राग्याने डोकीचे पागोटे जमिनी-वर आपटले आणि ‘ संभाजीचा पाडाव करीपर्यंत पागोटे घालणार नाही ’ असे तो बोलला.

शेवटी मोगल सैन्याने चहूकडून संभाजीवर चढाई केली. शेख निजाम नावाच्या औरंगजेबाच्या सरदाराने अनेक लबाडच्या व कारवाया करून संभाजीला संगमेश्वर मुक्कामी पकडले व हत्तीवर बांधून बादशहाकडे आणले!

औरंगजेब बादशहाच्या दरबारात संभाजीच्या धैर्याची पुरेपूर कसोटी झाली ! ‘ मुसलमानी धर्म स्वीकारलास तर तुझे प्राण वाचतील ’, अशी लालुच बादशाहाने त्याला दाखविली. पण अस्सल मराठा वीर होता संभाजी ! प्राण वाचविण्यासाठी आपला हिंदू धर्म तो कसा सोडील ?



संभाजी महाराज

‘स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ’ ही भगवद्गीतेची शिकवण त्याच्या मनावर ठसली होती ! आपला धर्म राखण्यासाठी मरण आलेले पुरविले. पण परक्याचा धर्म स्वीकारणे नको !

संभाजीने परधर्म स्वीकारण्यास नकार तर दिलाच. पण धर्मवेडचा औरंगजेबाला खिजविण्यासाठी तो म्हणाला, “ तुझ्या बेटीबरोबर माझी शादी करीत असलास तर तुझा धर्म स्वीकारतो मी ! ”

या अल्ला ! या खुदा ! कट्टा मुसलमान होता औरंगजेब ! तो संभाजीबरोबर आपल्या मुलीचे लग्न कसले लावणार ? संभाजीने असे बोलून आपला भयंकर अपमान केला, असे वाटले त्याला. त्याने हाल हाल करून संभाजीला मारले !

प्रथम संभाजीचे डोळे काढले. मग अंगाचे कातडे सोलून काढले ! पंधरा दिवसपर्यंत त्याचा एक एक अवयव तोडून कुत्र्याला खावयाला दिला !! शेवटी त्याला ठार मारले !!!

पण धन्य त्या वीराची ! त्याने हूं की चू केले नाही. किंवा मुसलमानी धर्म स्वीकारण्यास तो तयार झाला नाही !!!

खरोखर संभाजीला चांगली संगत मिळाली असती, त्याच्या सावत्र भावाला — राजारामाला—गादीवर बसवून सोयराबाईने त्याला चिडविला नसता, प्रत्येकाने आपला स्वार्थ बाजूला ठेविला असता तर वडिलांनी मिळविलेल्या कीर्तीत संभाजीने खात्रीने भर घातली असती ! 'बापसे बेटा सवाई' निघाला असता !

पण महाराष्ट्राला स्वार्थबुद्धीचा, दुहीचा नि फितुरीचा शापच आहे ना ? त्यापायी सारे उलटसुलट झाले !

मन दुबळे असले की असा माणसाचा तोल चुकतो बरं ! आणि तेजस्वी हिऱ्याची गारगोटी बनते ! म्हणून मन घट्ट ठेवा. कोणीही काहीही सांगितले तरी विचार न करिता मान तुकवू नका. वडील माणसांचा सल्ला घ्या. त्यात स्वतःच्या बुद्धीची मसलत मिसळा आणि वाईट संगत कटाक्षाने टाळा !

जगात आपल्या आजूबाजूला असे कितीतरी कबजी असतात! काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर ह्या सहा विकारांची रूपे घेतात हे कबजी . पण आपण त्यांच्या आहारी जाता कामा नये! उलट त्यांनाच आपण योग्य मार्गावर आणावे आणि अपकाराची फेड उपकाराने करावी !

## विष्णू कृष्ण चिपळूणकर-पुण्यतिथी

विष्णुशास्त्री चिपळूणकरांची पुण्यतिथी ह्या महिन्यात येते.

विष्णुशास्त्री यांना मराठी गद्याचे जनक म्हटले जाते. एवढेच नव्हे तर मराठी भाषेचे शिवाजी ह्या शब्दांत त्यांचा गौरव करण्यात येतो. मराठी भाषेसाठी त्यांनी तशीच झीज सोसली आहे. त्यांची " निबंधमाला " ह्याची उत्तम साक्ष देते. निबंधमालेत विष्णुशास्त्री यांनी अनेक खुळचट समजुतींवर हल्ला चढविला आहे. हे ठीक आहे. परंतु त्यांच्या वेळच्या सर्व कार्यकर्त्यांची आणि विचारवंतांची त्यांनी कुचेष्टा केली हे मात्र गैर आहे. न्या. रानडे, लोकहितवादी, आणि ज्योतिबा फुले हे त्यांच्या चेष्टेचे आणि छुप्या हल्ल्याचे ठराविक विषय होते. "निबंधमाला" नुसती चाळली तरी हे कळून येते.

दोषांकडे दुर्लक्ष करून गुणांचा गौरव करणे त्यांना सुचत नव्हते, रुचतही नव्हते. शास्त्रीबुवांना ह्याबद्दल दूषण लावणे भाग पडते. कारण पुढल्या काही मराठी लेखकांनी त्यांचे ह्या बाबतीत अनुकरण केले. दुसऱ्याच्या गुणांचा गौरव करण्याऐवजी त्याची कुचेष्टा करण्याची चटक मराठी लेखकांना चिपळूणकरांनी लावली असे म्हटले तरी चालेल.

चिपळणकरांचे हे दोष लोकांना आता पटू लागले आहेत. तरीसुद्धा त्यांना योग्य तो मान देणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांनी मासिके काढली होती. किताबखाना ही संस्था त्यांनीच स्थापन केली. आणि आपल्या लिखाणाने मराठी भाषेचे भांडार समृद्ध केले ह्यात शंका नाही. तेव्हा जे त्यांनी केले नाही ते आपण करू या. त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून मराठी भाषेच्या ह्या शिवाजीच्या गुणांचा गौरव करू या.

## हरिभाऊ आपटे–पुण्यतिथी

ह्याच शेवटच्या महिन्यात सुप्रसिद्ध लेखक हरिभाऊ आपटे ह्यांची पुण्यतिथी येते.

हरिभाऊंनी अनेक कादंबऱ्या लिहून भरीव समाजकार्य केले.त्यांच्या कादंबऱ्या निव्वळ मनोरंजनासाठी लिहिलेल्या नव्हत्या. त्यांच्या अठरा कादंबऱ्यांपैकी आठ कादंबऱ्या सामाजिक आहेत. समाजातील अनेक दोष वेशीवर टांगण्याच्या उद्देशाने ह्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. " पण लक्षात कोण घेतो " ह्या कादंबरीतील नायिका यमू ही त्या काळच्या अनेक असहाय्य विधवांची प्रतिनिधी होती.

हरिभाऊंच्या "गड आला पण सिंह गेला","उषःकाल" वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्याही खूप गाजल्या.

" करमणूक " हे साप्ताहिक त्यांनी सतत अठ्ठावीस वर्षे चालविले होते. मातृभाषेची केवढी अविरत सेवा केली त्यांनी. पैशाच्या किंवा कीर्तीच्या हव्यासाने त्यांनी लेखनाचा प्रचंड खटाटोप केला नाही. तर समाजाची सुधारणा व्हावी, जनतेत जागृती व्हावी ह्या हेतूने त्यांनी लिखाण केले. पुण्यातील "आनंदाश्रम" ही संस्था त्यांनीच स्थापन केली. काळाचा परिणाम म्हणून नव्या पिढीला हरिभाऊंची भाषा व शैली जुनाट वाटते. तरीसुद्धा त्यांच्या कादंबऱ्या जवळजवळ गेली शंभर वर्षे जनमनावर ठसा ठेवून राहिल्या आहेत. आणि जोवर मराठी भाषा आपले मानाचे स्थान टिकवून राहील तोवर हरी नारायण आपटे हे नाव अमर राहील.

त्यांच्या पुण्यातिथीचे स्मरण करताना ह्याहून मोठा मानाचा मुजरा दुसरा कोणता देता येणार ?

संपला आता हा फाल्गुन मास ! शिशिर ऋतू संपला ! आणि वर्षही संपले !

पण एक महत्त्वाची कामगिरी राहिली आहे ! चैत्र महिन्यातील गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर रोजनिशी लिहावयाला सुरुवात केली होती ना ? ती आता वर्षअखेर वाचावयाची. आणि आपल्या बऱ्यावाईट कृत्यांचा जमाखर्च पहावयाचा. होऽ होऽ ! जमाखर्च !

जमाखर्च काही फक्त पैशांचा ठेवीत नसतात ! आपल्या हरेक कृत्याचा जमाखर्च ह्या रोजनिशीत ठेवतो आपण. तेव्हा किती चांगली कृत्यें जमेच्या बाजूला आहेत आणि कळत नकळत आपल्या हातून कोणती वाईट कृत्ये घडल्यामुळे चांगल्या कृत्यांची संख्या खर्ची पडली आहे हे पहावयाचे.

एका वाईट कृत्यापायी एक चांगले कृत्य खर्ची पडते बरं ! तेव्हा आपला जमाखर्च उत्तम होण्यासाठी शक्य तेवढी अधिक चांगली कृत्ये हवीत नि शक्य तेवढी वाईट कृत्ये कमी असावीत. म्हणजे जमा फुगेल नि त्यातून काहीहि खर्ची जाणार नाही.

अशा सुन्दर जमाखर्चाची रोजनिशी तुम्ही ठेवू शकाल ! आणि आपल्या ह्या स्वतंत्र भारताचे आदर्श नागरिक व्हाल !

वाचून काढा आपापली रोजनिशी ! पहिलीच खेप आहे ही ! त्यामुळे जमाखर्चाचे बस्तान नीट बसले नसेल. हरकत नाही ! फाल्गुनाची अमावास्या आताच उलटली आहे ! चैत्राची प्रतिपदा—गुढीपाडवा—हाताशी आला आहे ! काळोख संपून प्रकाशाची तिरीप प्रकट होते आहे ! —

नवी रोजनिशी विकत घ्या. संपलेल्या वर्षातील चुका दुरुस्त करण्याचा नि त्या पुनः घडू न देण्याचा संकल्प करा. मागच्या वर्षी केलेली चांगली कृत्ये मागल्या अंकावरून पुढे चालू होणाऱ्या कादंबरीप्रमाणे चालू ठेवा. डोळे उघडे ठेवून, मन जागे ठेवून वागा.

**या फाल्गुन महिन्यात** येणाऱ्या होळीच्या सणातील घाणेरडा भाग काढून टाकण्याचा निश्चय केला आहे हे लक्षात ठेवा.

तुकाराममहाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त चांगले, परोपकाराचे कृत्य करण्याचे ठरवा.

शिवाजीमहाराजांप्रमाणे आपल्या देशाबद्दल अभिमान बाळगण्यास शिका. माणसाला आपले ते चांगले वाटते ! म्हणून आपला भारत कसाही असला तरी आपल्याला चांगलाच वाटणार ! पण तो इतरांनाही चांगला वाटावा म्हणून झटणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. विसरू नका हं हे !

संत एकनाथांच्या अंगातील दया, शांतता, सहनशीलपणा, समता ह्या गुणांचे अवश्य अनुकरण करा. एकनाथांच्या अंगात गुणांचा सिंधू—समुद्र—होता ! तुमच्या अंगी त्यातील एक बिंदू आला तरी पुरे ! प्रयत्नाने त्या बिंदूचा सिंधू करू शकाल तुम्ही !

संभाजीप्रमाणे धर्मावर निष्ठा ठेवा. आंधळी निष्ठा नव्हे. डोळस निष्ठा ठेवा. जुन्या चालीरीतींतील चांगले तेवढे निवडून काढा. त्यात नव्यातील चांगले मिसळा. म्हणजे दुधात साखर मिसळल्याप्रमाणे सारे गोड होईल ! —

ठीक ! नवी रोजनिशी विकत आणण्याची घाई झाली असेल तुम्हांला ! गुढी उभारण्याचेही वेध लागले असतील. तेव्हा निरोप घेऊ या.

गेल्या वर्षाच्या रोजनिशीतील जमाखर्चापेक्षा येत्या वर्षाच्या रोजनिशीतील जमाखर्च अधिक चांगला नि मनपसंत बनू दे, अशी तुम्हा सर्वांबद्दल सदिच्छा प्रकट करते हं मी ! —

**काळे वांगे हिरवा देठ, तुमची आमची गुढीपाडव्याला भेट !**

## स्वाध्याय


(१) तुकारामाच्या चरित्रावरून तुम्ही काय बोध घ्याल ?

(२) छत्रपती शिवाजी महाराजांचे कोणते स्वभाव–विशेष तुम्हांला आवडतात ?

(३) "सर्वांभूती ईश्वर" हे तत्त्व एकनाथांच्या स्वभावात असल्याचे कोणत्या गोष्टीवरून तुम्हास विशेष पटते ?

(४) संभाजीमहाराजांचा हृदयद्रावक अंत होण्यास त्यांच्या स्वभावातले कोणते दोष कारणीभूत ठरले ?

(५) थोडक्यात माहिती द्या :—
(अ) [illegible], (ब) [illegible], (क) [illegible].



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
१५
BVBK-0401548

# आमचे बालवाङ्मय

| | रु. पै. |
|---|---|
| * मला वाटते | १–४० |
| * उत्कल प्रसंग | १–५० |
| * छोट्यांची मोठी साहसे | १–०० |
| * इच्छानगरी (नाटक) | १–०० |
| * भारतीय सण व उत्सव | ६–०० |
| * बोलके कुत्रे आणि इतर गोष्टी | ०–७५ |
| * राजपूत असे लढले, भाग २ प्रत्येकी | ०–८० |
| * हिमालयासम आमुचे वीर, भाग १ ते ३, किंमत प्रत्येकी | ०–८० |
| * थोरांच्या नवलकथा भाग १ ते ६ किंमत प्रत्येकी | ०–७५ |
| * इतिहासातील नवलकथा | ०–७५ |
| * ससेभाऊंच्या गमतीजमती | ०–५० |
| * कावळोबांच्या जमती | ०–९० |
| * माकडभाऊंच्या गमतीजमती | ०–६० |
| * गाढवभाऊंच्या गमतीजमती | ०–६० |
| * उंदिरमामांची कहाणी | ०–७५ |
| * आपण सारे एक | ०–७५ |
| * नामदेवाची दिवाळी | ०–३७ |
| * भेंड्या व अक्षर बापूजी | ०–६० |
| * वन्य पशूंच्या मौजा | ०–५० |
| * भारताच्या इतिहासातील मनोरंजक कथा | ०–५० |
| * संवाद-सुमने | ०–८० |
| * महर्षि कर्वे-चरित्र | ०–५० |
| * गोष्टीच गोष्टी, भाग १ ते १० प्रत्येकी | ०–६० |
| * सोनपंखी | २–३० |
| * मुलांचे रवींद्रनाथ | १–५० |

याशिवाय आणखी पुस्तके तयार होत आहेत.

माहितीपत्रक मागवा.

# अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.

ठीक ! नवी रोजनिशी विकत आणण्याची घाई झाली असेल तुम्हांला ! गुढी उभारण्याचेही वेध लागले असतील. तेव्हा निरोप घेऊ या.

गेल्या वर्षाच्या रोजनिशीतील जमाखर्चापेक्षा येत्या वर्षाच्या रोजनिशीतील जमाखर्च अधिक चांगला नि मनपसंत बनू दे, अशी तुम्हा सर्वांबद्दल सदिच्छा प्रकट करते हं मी !—

**काळे वांगे हिरवा देठ, तुमची आमची गुढीपाडव्याला भेट !**

## स्वाध्याय

(१) तुकारामाच्या चरित्रावरून तुम्ही काय बोध घ्याल ?

(२) छत्रपती शिवाजी महाराजांचे कोणते स्वभाव-विशेष तुम्हांला आवडतात ?

(३) "सर्वभूती ईश्वर" हे तत्त्व एकनाथांच्या स्वभावात असल्याचे कोणत्या गोष्टीवरून तुम्हास विशेष पटते ?

(४) संभाजीमहाराजांचा हृदयद्रावक अंत होण्यास त्यांच्या स्वभावातले कोणते दोष कारणीभूत ठरले ?

(५) थोडक्यात माहिती द्या :—
(अ) मदनदहन, (ब) पूतनामर्दन, (क) अष्टप्रधान व्यवस्था.

BVBK-0401548

# आमचे बालवाङ्मय

| | रु. पै. |
|---|---|
| * मला वाटते | १–४० |
| * उत्कल प्रसंग | १–५० |
| * छोट्यांची मोठी साहसे | १–०० |
| * इच्छानगरी ( नाटक ) | १–०० |
| * भारतीय सण व उत्सव | ६–०० |
| * बोलके कुत्रे आणि इतर गोष्टी | ०–७५ |
| * राजपूत असे लढले, भाग २ प्रत्येकी | ०–८० |
| * हिमालयासम आमुचे वीर, भाग १ ते ३, किंमत प्रत्येकी | ०–८० |
| * थोरांच्या नवलकथा भाग १ ते ६ किंमत प्रत्येकी | ०–७५ |
| * इतिहासातील नवलकथा | ०–७५ |
| * ससेभाऊंच्या गमतीजमती | ०–५० |
| * कावळोबांच्या जमती | ०–९० |
| * माकडभाऊंच्या गमतीजमती | ०–६० |
| * गाढवभाऊंच्या गमतीजमती | ०–६० |
| * उंदिरमामांची कहाणी | ०–७५ |
| * आपण सारे एक | ०–७५ |
| * नामदेवाची दिवाळी | ०–३७ |
| * भेंड्या व अक्षर बापूजी | ०–६० |
| * वन्य पशूंच्या मौजा | ०–५० |
| * भारताच्या इतिहासातील मनोरंजक कथा | ०–५० |
| * संवाद-सुमने | ०–८० |
| * महर्षि कर्वे-चरित्र | ०–५० |
| * गोष्टीच गोष्टी, भाग १ ते १० } प्रत्येकी | ०–६० |
| * सोनपंखी | २–३० |
| * मुलांचे रवींद्रनाथ | १–५० |

याशिवाय आणखी पुस्तके तयार होत आहेत.

माहितीपत्रक मागवा.

# अ. वि. गृह प्रकाशन. पुणे २.